**Maharashtra Education Society, Pune**
**M.E.S. Ayurved Mahavidyalaya**
Ghanekhunt-Lote, Tal. Khed, Dist. Ratnagiri – 415722
Ph.No.: (02356) 661551, 661550.
Email: mesayurved@mespune.in Website: ayurved.mespune.in

# राजपथावरील संचालनात एमइएस आयुर्वेद महाविद्यालयाचा सहभाग

दिनांक २६ जानेवारी २०२१ रोजी दिल्ली येथे राजपथावर होणाऱ्या पथसंचलनासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित एमइएस आयुर्वेद महाविद्यालयातील चतुर्थ वर्ष बी.ए.एम.एस. मध्ये शिकत असलेला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक श्री. सतीश इंदरलाल देवासी याची निवड झाली आहे.

राजपथावरील पथसंचलन व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी केंद्र सरकारच्या युवा व खेळ मंत्रालय, नवी दिल्ली आणि राज्य शासनाने निर्देशित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेतील उत्कृष्ट स्वयंसेवकाची निवड केली जाते. पश्चिम परिक्षेत्राच्या सात राज्यांमधून स्वयंसेवक निवडीकरिता अनुराग विद्यापीठ, हैद्राबाद येथे पूर्व प्रजासत्ताक पथसंचलन शिबीर नुकतेच पार पडले. यात महाराष्ट्रातील १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये श्री. सतीश देवासी या एमइएस आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याचा याचा समावेश आहे. याबद्दल त्याचे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे यांचे अध्यक्ष एअर मार्शल श्री. भूषण गोखले, नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. राजीव सहस्त्रबुद्धे, उपाध्यक्ष डॉ. माधव भट यांनी अभिनंदन केले. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. दिलीपजी म्हैसेकर यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शाम भाकरे यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

